# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - ८१५/२०२२/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. किसन दगडू गांजवे,<br>मु. पो. शनी चौक, खालची पेठ, इगतपुरी,<br>ता. इगतपुरी, जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, टाकेद बु.,<br>ता. इगतपुरी, जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, इगतपुरी,<br>ता. इगतपुरी, जि. नाशिक. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक - ०३/०८/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २९/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती पुरविली, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०३/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित** - सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक जानेवारी, १९६३ ते सन १९९३ या कालावधीतील १) कै. दगडु हरी गांजवे (अपिलार्थी यांचे वडील) यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे घर त्यांचे नांवे आहे किंवा त्यात काही फेरफार करण्यात आलेला असल्यास त्याची माहिती, २) कै. दगडु हरी गांजवे यांचे नांवे असलेल्या घराच्या नोंदी काही फेरफार असल्यास ती कोणत्या आधारे करण्यात आली आणि केव्हापासुन करण्यात आलेली आहे, त्याची माहिती व त्या कागदपत्रांच्या नकला तसेच ३) कै. दगडु हरी गांजवे यांचे नांवे असलेल्या घराच्या नोंदीत फेरफार करण्याकरिता ग्रामपंचायत मिटींगमध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला असल्यास त्या मिटींगमध्ये या संदर्भात कोणती कागदपत्रे ठेवण्यात आली त्याच्या नकला व मिटींगमध्ये पारित करण्यात आलेल्या ठरावाची नक्कल याबाबत माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक २२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ बाबत सन १९५९-६० नमुना नंबर ८ चा एकच उतारा आढळुन आला, मुद्दा क्र. २ बाबत सन १९६३ ते सन १९९३ फेरफार नोंदी रजिस्टर तपासले असता कोणत्या फेरफार नोंदी आढळुन येत

नाहीत, मुद्दा क्रं. ३ बाबत सन १९६३ ते सन १९९३ चे मिटींग प्रोसिडींग रजिस्टर तपासले असता मिटींगमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव आढळुन येत नाहीत, असे कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक २९/०८/२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक २८/१०/२०२१ रोजी सुनावणी घेऊन. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या घराची माहिती ०७ दिवसांत विनामुल्य पुरवावी, असे आदेश देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २४/६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती आढळुन येत नाही, असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे स्पष्ट होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही नमुद केले की, रजिस्टरमध्ये नोंद नाही, सदर रजिस्टर अपिलार्थी यांना समक्ष दाखविले आहे. तसेच अपिलार्थी यांनी देखील आयोगास नमुद केले की, सदर रजिस्टर बघितलेले असुन माहितीचे अवलोकन केले आहे, मात्र रजिस्टर मध्ये नोंद का घेतली नाही, याबाबत माहिती पाहिजे आहे. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती आढळुन येत नाही, असे कळविले आहे. मात्र माहिती का आढळुन येत नाही, याबाबत कोणतेही सुस्पष्ट कारण नमुद केलेले नाही.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकेद बु., यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही, त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ८१५/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र. ८१५/२०२२/नाशिक/ओ- २१०४ दिनांक १८/१०/2022